# चंद्रपूर जिल्हा पोलीस

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

३१ मार्च, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

## महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ६८ नुसार नोटीस

दिनांक १ एप्रिल २०२० रोजी बहुतांश लोक आपले नातेवाईक, मित्र परिवार व हितसंबधीतांना **एप्रिल फुल** करीत असतात. त्यातुन एक वेगळा प्रकारचा आनंद मिळत असतो. परंतु सद्यस्थितीत आपण कोरोना व्हायरस (COVID- 19) च्या संकटाशी सामना करीत आहोत. यासंदर्भाने शासनाकडुन संपुर्ण देशामध्ये दिनांक २५ मार्च २०२० पासुन २१ दिवस लॉकडाउन घोषीत करून संचारबंदी केलेली आहे.

यामुळे नागरीकांनी कोरोना व्हायरस (COVID- 19) च्या संदर्भाने लोकांमध्ये कोणत्याही प्रकारचे संभ्रम निर्माण होईल अशा प्रकारचे मॅसेजेस/पोस्ट/फोटो/व्हिडीओ सोशल मिडियावर (फेसबुक, व्हॉट्सअॅप, ट्विटर, इंस्टाग्राम, टिकटॉक व इतर सोशल मिडीया माध्यमे) पोस्ट अथवा सेंड करून नये. तसेच सोशल मिडीयावर व्हायरल करू नये. जेणेकरून जनमाणसांमध्ये संभ्रमावस्था निर्माण होउन संचारबंदी/लॉकडाउन चे उल्लंघन होणार नाही. तसेच प्रशासनावर ताण पडणार नाही व कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही.

याद्वारे चंद्रपुर जिल्हयातील सर्व नागरीकांना निर्देश देण्यात येते की, कोरोना विषाणु (COVID- 19) च्या संदर्भाने खोटे मॅसेजेस किंवा अफवा सोशल मिडीयावर पसरविल्यास/व्हायरल करणारा व संबंधीत ग्रुप अॅडमीन यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ६८ नुसार प्रतिबंध करीत आहे. असे कृत्य केल्यास आपल्यावर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४० सह भारतीय दंड संहिता कलम १८८ व इतर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ नुसार गुन्हा नोंद करण्यात येईल.

**टिप:** ग्रुप अॅडमिनने तात्काळ आपल्या ग्रुप मधील सर्व ग्रुप मधील सदस्यांना सुचना दयाव्यात. तसेच सेटिंग मध्ये जावुन फक्त ग्रुप अॅडमिन मॅसेज सेंड करेल अशी सेटींग करावी.

(**डॉ. महेश्वर रेड्डी** भापोसे)
पोलीस अधीक्षक,
चंद्रपुर